FORM-1A

N.C.R.B.
I.I.F.-I

# पहिली खबर
# FIRST INFORMATION REPORT

0154176

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State महाराष्ट्र, जिल्हा District मुंबई, पोलीस ठाणे Police Station ला.प्र.वि.मुंबई, पहिली खबर क्र. FIR No. ९८, वर्ष Year २०२२, दिनांक Date 28/03/2022

2. (i) अधिनियम Act भ्र.प्र.अधि.१९८८, कलमे Sections ७, १२
(ii) अधिनियम Act ..., कलमे Sections ...
(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ...

3. (a) अपराधाची घटना : वार Occurrence of offence : Day सोमवार, तारीख पासून Date from 27/03/22, वेळ Time ..., तारीख पर्यंत Date to 28/3/22, वेळ Time 00:30

वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).

(1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
(6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00

(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date 27/03/2022, वेळ Time ...

(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. 02/22, तारीख Date 28/03/22, वेळ Time 00:30

4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी, लेखी / तोंडी Written / Oral ...

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ..., चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. ...
Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. Chouki / Beat / O.P. Name and No.
(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name रु.नं.२४०, पहिला मजला, पणन विभाग, गृहनिर्माण भवन, ठिकाणाचे क्र. No. if any, गल्ली Ward, रस्त्याचे नाव Name of road
जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place म्हाडा कार्यालय, गाव Village बांद्रा, पोस्ट Post पूर्व, मुंबई ४०००५१, तालुका Taluka ..., जिल्हा Dist. ..., राज्य State ...
(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव In case, outside the limit of this Police Station ..., तालुका Taluka ..., जिल्हा Dist. ..., राज्य State ...

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
(a) नाव Name श्री. राहुल जाधव (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name श्री. लक्ष्मण जाधव
(c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age ३५ वर्षे (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय, फोन नं. Phone No. 8652716359
(e) पारपत्र क्रमांक Passport No. ..., दिल्याचा दिनांक Date of Issue ..., दिल्याचे ठिकाण Place of Issue ..., (f) व्यवसाय Occupation ...
(g) धर्म Religion हिंदू, जात Caste ..., जनजात Sub-Caste ...
(h) पत्ता Address : गगनगिरी, गल्ली Ward इमारत, बी.३८/१७०, नाव House/Name No. प्रतिक्षा नगर, Phone/Mo. No. सायन कोळीवाडा, PAN No. मुंबई ४०००२२, Card No.
रस्त्याचे नाव Road ..., जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ..., गाव Village ..., पोस्ट Post ..., पो. स्टे. P Stn ...
तालुका Taluka ..., जिल्हा Dist. ..., राज्य State ..., सध्याचा पत्ता Present Address ...

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to Case Diary.)

आलोसे क्र.१) श्री यशवंत गणपत गोसावी, वय ५४ वर्षे, मिळकत व्यवस्थापक
आलोसे क्र.२) श्री. संदिप किशनराव पांचाळ, वय ३६ वर्षे, वरिष्ठ लिपीक
कार्यालयाचा पत्ता - म्हाडा कार्यालय, बांद्रा पूर्व, मुंबई ४०००५१

Y.P.P.-800 Reg.-(25×6=150 Lvs.)-2-2018-PA3-(K) 826.

Scanned with OKEN Scanner

फिर्यादी राहुल लक्ष्मण जाधव यांची फिर्याद स्वतंत्र कागदावर टंकलिखीत केली असून तीच प्रथम खबरी अहवाल म्हणून संबोधण्यात येत आहे.

समक्ष

Rahul Jadhav

[signature]

राहुल कारभारी
पोलीस निरीक्षक
ला. प्र. वि. मुंबई.

Scanned with OKEN Scanner

फिर्याद

दि. २४/०३/२०२२

श्री. राहुल लक्ष्मण जाधव, वय ३५ वर्षे, धंदा— खाजगी नोकरी, रा.ठि.— गगनगिरी इ. नं.टी,३८/११०,प्रतिक्षा नगर सायन कोळीवाडा,मुंबई ४०००२२, मो.नं. ८६५२७१६३६९.

.........

मी वरिलप्रमाणे असून वर नमुद पत्यावर माझे कुटुंबियांसह रहात असुन मी खाजगी नोकरीस असून त्यातून मिळणा—या उत्पनातून माझा व माझ्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतो.

मला एक बहिण असून तिचे लग्न झाले आहे तिचे नांव सौ. कविता सोमनाथ थिटे असे आहे. माझे बहिणे पती (मेव्हणे) श्री सोमनाथ बबन थिटे यांना म्हाडा मध्ये अल्प उत्पन्न गटातून लॉटरी सोडत पध्दतीमध्ये २०१८/संकेत क्र.३५०/संवर्ग जीपी— १२८ अन्वये अँन्टॉप हिल येथे इमारत क्र ३, बी, १९ गाळा क्र १९०४ गाळा/सदनिका मिळालेली होती. त्याबाबतची सर्व कागदोपत्री पूर्तता माझे मेव्हूणे श्री सोमनाथ बबन थिटे यांनी केलेली होती. तरी गाळयाच्या कागदपत्रे अपूर्ण असून त्यांच्या त्रुटी आढळून आल्या आहे. नमुद गाळा हस्तारीत करण्याकरीता म्हाडा कार्यालय पणन कक्ष रूम नं.२४० येथील अधिकारी श्री.गोसावी हे पैशाची मागणी करीत आहेत, असे मला मेव्हूणे श्री सोमनाथ बबन थिटे यांनी सांगीतलेले होते.

मागील आठवडयात मी व माझा मेव्हणा सोमनाथ थिटे असे दोघे, म्हाडा अधिकारी श्री गोसावी साहेब यांना समक्ष भेटून गाळा हस्तांतरीत करण्याकरीता विनंती केली असता, गोसावी साहेब यांनी सुरूवातीस रू.७५,०००/— ची मागणी केली. त्यावेळी मी त्यांना सांगितले की, ''माझा मेव्हणा थिटे हे खाजगी वाहनावर चालक आहेत एवढी मोठी रक्कम देणे त्यांना शक्य होणार नाही.'' त्यावेळी श्री गोसावी साहेब यांनी सांगितले कि ''रू.२५,०००/— मध्ये तुमचे काम करतो. मला वर—खाली सर्वांना बघावे लागते. असे सांगून त्यांनी त्यांचा फोन नंबर दिला व दिनाक २२/०३/२०२२ रोजी त्यांच्या मोबईल वर संपर्क करून भेटण्यास सांगितले. श्री गोसावी यांनी मागितलेली रक्कम ही कोणतीही शासकीय फी नाही त्यांनी मागणी केलेली रक्कम लाच आहे. श्री गोसावी यांना मला लाच देण्याची ईच्छा नसल्यामुळे मी दिंनाक २१/०३/२०२२ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग मुंबई येथे येवून म्हाडा विभाग येथील गोसावी यांचे विरूध्द लेखी तक्रार केली.

त्यानंतर मी दिलेल्या तक्रारीच्या अनुषगाने दिंनाक २२/०३/२०२२ रोजी दोन शासकीय पंचा समक्ष पडताळणी पंचनाम करण्यात आला. श्री.गोसावी साहेब यांनी त्यांचे मोबाईलवर संपर्क करून भेटण्यास बोलविले असल्याने, त्यांना त्यांचे मोबाईल क्र ९८९२९३९४९५ यावर संपर्क केला असता, त्यांनी कार्यालयात येवून भेटण्यास सांगितले. त्यांप्रमाणे मी व पंच श्रीमती चव्हाण मॅडम श्री.गोसावी साहेब यांना मी त्यांचे म्हाडा येथील कार्यालयात रूम नं २४० मध्ये जावून भेटलो. आमच्या भेटीदरम्यान श्री.गोसावी साहेब यांनी पंच श्रीमती चव्हाण मॅडम यांचे विषयी चौकशी करून त्यांना बाहेर थांबण्यास सांगितले. त्यानंतर आमच्यातील संभाषणा दरम्यान त्यांनी आम्हाला समोरून पैसे दयाचे आहेत ना? असे बोलून पैश्याची मागणी केली. साहेबाचे रू ५०,०००/— आम्ही दोघात रू २५,००००/— अशी रू ७५,०००/— मागणी केली व मला तेथून जाण्यास सांगितले मी जात असताना,त्यांचे समोरील टेबलवरील कागदावर ''कॉल करा'' असे लिहून हाताने इशारा केला. त्या नंतर मी त्यांना सांयकाळी त्यांचे वरील मोबाईल नंबर ८६५२७१६३६९ यावरून संपर्क केला असता, ते आज कामात आहेत. उदया कार्यालयात येण्यास सांगितले.

महिला श्रीमती.चव्हाण मॅडम यांना सोबत आणू नये अशी सुचना श्री.गोसावी यांनी कालच्या भेटीत दिल्या असल्याने, पंच श्री. निखाडे यांचेसह आज दिंनाक २३/०३/२०२२ रोजी श्री.गोसावी साहेब यांना त्याचे कार्यालयात जावून भेटलो. भेटी दरम्यान श्री.गोसावी साहेब यांनी लाचेची रक्कम देण्याबाबत मला सांगितले. मी रक्कम येथेच देवू का? असे विचारले असता कार्यालया बाहेर ३ नंबर गेट जवळ समोर थांबण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी व पंच श्री.निखाडे असे गेट क्र ३ जवळ येवून थांबलो. काही वेळातच श्री. गोसावी साहेब ही आले. त्यांनी



RLJadhav

Scanned with OKEN Scanner

आम्हाला गेटच्या डाव्या बाजूस काही अंतरावर असलेल्या सिध्दीविनायक हॉटेल येथे घेवून गेले. तेथे चहा पित असताना कामा विषयी चर्चा केली. त्यादरम्यान श्री गोसावी यांनी पंच श्री. निखाडे यांच्या विषयी चौकशी करून, त्यांना गेट नंबर ३ येथे जावून थांबण्यास सांगितले. पंच श्री.निखाडे गेल्यानंतर श्री गोसावी साहेब यांनी मला सिध्दीविनायक हॉटेलच्या मागील दरवाजाने बाजूच्या गल्लीतून चालत घेवून गेले, काही अंतरावर असलेल्या गोमांतक हॉटेल समोर त्यांनी **किती आणला.?.. दे** '' असे म्हणून माझेकडील पैश्याची मागणी केली. **''पंच्याहात्तर आहेत पुर्ण, मोजून घ्या..''** असे मी त्यांना सांगितले असता, त्यांनी मला **''रस्त्यात मोजू का** ? असा प्रती प्रश्न विचारला व सांगितले की, **''कार्यालयात गेल्यानंतर मोजतो''**. त्यांनतर आम्ही कामा विषयी बोलत म्हाडा गेट क्र ३ समोर आलो असता, त्यांनी मला जाण्यास सांगितले. श्री गोसावी सोहब हे त्यांच्या कार्यालयात निघून गेले. त्यानंतर मी सापळा पथकास श्री गोसावी साहेब यांनी लाच स्विकारल्याबाबत तोंडा वरील मास्क काढून हाताने फिरवून पूर्व नियोजीत इशारा केला. त्यांनतर सापळा पथक असे श्री गोसावी साहेब यांचे कार्यालयात जावुन पोनि कारभारी यांनी स्वताची व सापळा पथकाची ओळख दिली व त्यांनी स्वीकारलेल्या लाचेच्या रक्कमेबबात चौकशी केली. त्यानंतर श्री गोसावी साहेब यांचे पॅन्टच्या खिशात लाच रक्कम मिळुन आल्याने त्यांनी लाच रक्कम स्विकारल्याने रंगेहाथ पकडले. त्याना त्यांचे पूर्ण नांव विचारले असता, त्यांनी त्यांचे नांव श्री.अनिल ऊर्फ यशंवत गणपत गोसावी, पद मिळकत व्यस्थापक, पणन विभाग, मुंबई मंडळ, म्हाडा असे सांगितले. त्यांनतर त्यांची झडती घेतली असता, मी त्यांना दिलेल्या लाचेच्या रक्कमेतील रू. ७५,०००/— पैकी रू.५०,०००/— हे त्यांचे पॅन्टच्या खिश्यात मिळून आले उर्वरीत रक्कमे बाबत पो.नि कारभारी विचारले असता. त्यांने त्यांतील रू २५,०००/— हे त्यांचे बाजूस बसलेले त्यांचे सहाय्यक श्री. पांचाळ यांना दिले असल्याचे सांगितले. त्यांनतर पो.नि कारभारी यांनी पंचान समक्ष श्री. पांचाळ यांना त्यांचे नांव विचारले असता त्यांनी त्यांचे नांव श्री. संदीप किशनराव पांचाळ , पद— वरिष्ठ लिपीक, मिळकत व्यवस्थापक, पणन विभाग, मुंबई मंडळ, म्हाडा असे सांगितले. त्यांनतर पो.नि कारभारी यांनी पंचा समक्ष श्री. पांचाळ याची झडती घेतली असता त्यांच्या पॅन्टच्या खिश्यात रू २५,०००/— लाचेची रक्कम मिळून आली. सदर रक्कमेची पंचानी खात्री केली असता मी दिलेल्या लाच रक्कमे मधील त्याच नोटा असल्याचे दिसून आले. त्यांनतर श्री. यशवंत गोसावी साहेब (ऊर्फ अनिल) व पांचाळ यांना ला.प्र.वि वरळी येथे आणून पुढील कायदेशीर कारवाई केली आहे.

तरी श्री.अनिल ऊर्फ यशवंत गोसावी यांनी माझे मेव्हणे श्री.सोमनाथ थिटे यांस म्हाडा सोडत—२०१८/संकेत क्र ३५०/संवर्ग— जी.पी—११८ ही संदनिका लॉटरी अन्वये लागली असताना सदर सदनिका हस्तांतरित करण्याकरिता रू ७५,०००/— लाचेची मागणी करून ती स्विकारली आहे. सदर लाच रक्कमेपैकी रू २५,०००/— इतकी रक्कम श्री. गोसावी यांनी त्यांचे मदतनीस वरिष्ठ लिपीक श्री.संदीप पाचाळ यांनी माझे मेव्हूणे श्री. सोमनाथ थिटे यांचे फाईलची त्रुटी न काढता पूर्तता करण्यासाठी दिले व श्री. संदीप पांचाळ यांनी सदरची लाच रक्कम श्री. गोसावी यांचेकडून स्विकारली आहे. म्हणून माझे त्यांचे विरूध्द कायदेशीर तक्रार आहे.

माझा श्री. अनिल ऊर्फ यशवंत गोसावी व श्री संदीप पांचाळ यांचेशी कोणताही आर्थीक देवाण—घेवाणीचा व्यवहार किंवा त्यांचेशी कोणतेही वैमनस्य नाही.

माझा जबाब पो.नि. राहुल कारभारी यांनी संगणकावर मराठीत टंकलिखित केला असून, तो मी वाचून पाहिला तो माझे सांगणेप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष,

( राहुल कारभारी)
पोलीस निरिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई



Scanned with OKEN Scanner

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ..............................

Reasons for delay in reporting by the Complainant / Informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page

..............................

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ..............................

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ..............................

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page

यातील नमुद ता.वे. व ठिकाणी यातील 'फि' यांचे नातेवाईक श्री. चिटे यांना म्हाडा कडून देण्यात आलेला अल्प उत्पन्न गटातून लॉटरी सोडत पद्धतीमध्ये सं.क्र. ३५० अॅन्टॉपहिल येथे इ.क्र. ३, B, १९ गाळा क्र. १००४ हा मिळालेला होता सदर गाळ्याचे ताबापत्र देवून सदनिका हस्तांतरीत करण्यासाठी आलोसे (1) श्री गोसावी, पद मिळकत व्यवस्थापक म्हाडा यांनी 'फि' यांचेकडे 75,000/- रु लाचेची मागणी केली हे जी 'फि' यांनी लाप्रवि कार्यालयामध्ये लेखी तक्रार दिल्यानंतर दि. २२/०३/२२ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई मध्ये आलोसे श्री. गोसावी यांनी 75,000/- रु. लाच मागितल्याचे निष्पन्न झाले होते दि. २३/०३/२२ रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाई मध्ये आलोसे (1) श्री गोसावी यांनी 'फि' यांच्याकडून 75,000/- रु. लाच स्विकारुन त्यापैकी 25,000/- रु. त्यांचे मदतनीस श्री. पांचाळ यांना 'फि' यांचे काम करण्यासाठी दिले सापळा कारवाई अंतर्गत आलोसे क्र. ०१ व ०२ यांना रंगेहात पकडून लाचेची रक्कम हस्तगत करण्यात आली आहे म्हणून गुन्हा नोंद.

13. **केलेली कार्यवाही** – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

पोलिस निरीक्षक राहुल कारभारी

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, ..............................

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन.............., जिल्हा.............., राज्य..............

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.)................. Rank............... No............... to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to.............................................. (3) Transferred to P. S. .............................................. District.............................................. on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant, free of cost.

(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा

Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.

Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name ...राहुल कारभारी...

पदनाम Rank...पोलिस निरीक्षक...

तपासिक अं. चा कोड क्र. ..............................

Posting

Code No. of I. O. ..............................

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख...................

1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.

Copy to 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of First Information Report

Scanned with OKEN Scanner